दिनांक १६/१०/२०२०

## प्रसिध्दी पत्रक

**भास्कर रामजी खरात, सहायक फौजदार, नेमणुक- पोलीस ठाणे मुकुंदवाडी, औरंगाबाद शहर यांनी १४,५००/- रु किंमतीचा एक रेडमी कंपनीचा नोट ९ मोबाईल लाच म्हणून स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव व पत्ता | :- | भास्कर रामजी खरात, वय ५७ वर्ष, सहायक फौजदार, नेमणुक- पोलीस ठाणे मुकुंदवाडी, औरंगाबाद शहर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे क्रांतीचौक, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे. |
| घटनेचे ठिकाण | :- | हॉटेल आशीयाना, बाबा पेट्रोल पंप जवळ, औरंगाबाद |
| लाच स्विकारली रक्कम | :- | **१४,५००/- रु किंमतीचा एक रेडमी कंपनीचा नोट ९ मोबाईल** |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे तक्रारी अर्जातील गैरअर्जदार यांनी सादर केलेल्या प्लॉटच्या मालकी हक्क सांगणाऱ्या कागदपत्रांच्या छायांकीत प्रती देण्यासाठी. |
| तपासी अधिकारी | | श्री. गणेश धोक्रट, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार हे त्यांचे प्लॉट वर बांधकाम करत असतांना, त्यास मनाई व शिविगाळ करणाऱ्या लोकांविरोधात तक्रारदार यांनी मा. पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर यांच्याकडे तक्रार अर्ज दिला होता. सदर तक्रार अर्ज हा नमुद लोकसेवक पोलीस ठाणे एम वाळुज येथे नेमणुकीस असतांना, त्यांच्याकडे चौकशी कामी देण्यात आला होता. नमुद लोकसेवक यांनी वर नमुद कारणास्तव तक्रारदार यांच्याकडे रेडमी कंपनीचे एक नवीन मोबाईलची मागणी करत असल्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद कडे दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, भास्कर खरात, सहायक फौजदार, नेमणुक- पोलीस ठाणे मुकुंदवाडी, औरंगाबाद शहर यांनी तक्रारदार यांच्याकडे रेडमी कंपनीचा १४,०००/- ते १५,०००/- किंमतीचा एक नवीन मोबाईलच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज दिनांक १६/१०/२०२० रोजी वर नमुद ठिकाणी सापळा लावण्यात आला असता, आरोपी लोकसेवक भास्कर रामजी खरात, वय ५७, सहायक फौजदार, नेमणुक- पोलीस ठाणे मुकुंदवाडी, औरंगाबाद शहर यांनी मागणी केल्याप्रमाणे १४,५००/- रुपये किंमतीचा मोबाईल लाच म्हणून स्विकारल्यानंतर सदर आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे क्रांतीचौक, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, मा. डॉ.अनिता जमादार, अपर पोलीस अधीक्षक, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. गणेश धोक्रट यांनी केली आहे. त्यांना पोना विजय बाम्हंदे, सुनिल पाटील, अरूण उगले, मिलींद इपर व चालक पोशि बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

पोलीस उप अधीक्षक कार्यालय ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.